MAHARASHTRA
TOURISM

## महाराष्ट्र:


# एक अनोखं जग

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन

जुलै २०२६ / अंक ७



ठोसेघर धबधबा



सहस्त्रकुंड धबधबा



लिंगमळा धबधबा

जुलै 2026 महिन्यामध्ये राज्याच्या पर्यटन क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक भागीदारी, सांस्कृतिक उपक्रम आणि वारसा संवर्धन यावर विशेष भर देण्यात आला. 17 व्या 'वॉव पुरस्कार आशिया' पुरस्कार सोहळ्यामधील पर्यटन विभागाच्या सहभागामुळे बैठका, प्रोत्साहनपर दौरे, परिषदा, प्रदर्शने (MICE), डेस्टिनेशन विवाहसोहळे आणि जागतिक दर्जाच्या कार्यक्रमांसाठी महाराष्ट्र राज्य अग्रगण्य पर्यटनस्थळ म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. तसेच 'चला पंढरीसी जाऊ' यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे राज्याच्या समृद्ध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडले. नवीन पर्यटन भागीदारी, जलपर्यटन प्रकल्प, वारसा स्मारकाची उभारणी तसेच 'वन स्टेट वन डेस्टिनेशन' या उपक्रमांतर्गत विविध पर्यटनस्थळांच्या विकासासाठी राज्य शासनाची दृढ वचनबद्धता स्पष्ट झाली. वर्षभर पर्यटकांना आकर्षित करणारे आणि देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी पसंतीचे पर्यटनस्थळ म्हणून जागतिक स्तरावर महाराष्ट्र राज्याचे स्थान अधिक बळकट होत आहे.

## MICE क्षेत्रासाठी 'वॉव पुरस्कार आशिया'मध्ये पर्यटन विभागाला पुरस्कार



महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या सहाय्याने 17वा 'वॉव पुरस्कार आशिया' कार्यक्रम उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमामध्ये दालन उभारून पर्यटन विभागाने सहभाग घेतला. दालनाच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे महाराष्ट्रामधील पर्यटन स्थळांचा प्रचार व प्रसार करण्यात आला. राज्यातील पर्यटन स्थळांची माहिती जगभरात पोहोचविणे हा या दालनामागचा मुख्य उद्देश होता. महाराष्ट्राला पर्यटन, व्यावसायिक परिषद व प्रदर्शने, डेस्टिनेशन विवाहसोहळे आणि विशेष कार्यक्रमांसाठी देशातील अग्रगण्य राज्य म्हणून विकसित करण्याच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे. महाराष्ट्र पर्यटन विभागाला सदर कार्यक्रमामध्ये 'बेस्ट स्टेट फॉर माईस, वेडिंग्स अँड लाइव्ह इव्हेंट्स' या विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे 'वॉव पुरस्कार आशिया' कार्यक्रम दिमाखात पार पडला. सदर कार्यक्रमाचा शुभारंभ पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव, श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.), तत्कालीन संचालक, श्री. मंगेश जोशी (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आला. पर्यटन विभागाचे उप सचिव श्री. संतोष रोकडे, श्री. विजय पोवार, पर्यटन संचालनालयाचे सहसंचालक श्री. संतोष जाधव, कोकण विभागाच्या पर्यटन उपसंचालिक प्रज्ञा मनोहर आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र पर्यटनाच्या युवा दूत नवेली देशमुख सदर कार्यक्रमामध्ये उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी विजेत्यांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

## 'चला पंढरीसी जाऊ' कार्यक्रमामध्ये पर्यटन विभागाचा उल्लेखनीय सहभाग

महाराष्ट्राची वारकरी व संत परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि धार्मिक पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'चला पंढरीसी जाऊ' कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र पर्यटन विभागाने घेतलेला सहभाग उल्लेखनीय ठरला. सदर सांस्कृतिक कार्यक्रम प्रभादेवीमधील रविंद्र नाट्य मंदिर, विलेपार्ले येथील मास्टर दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह, ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह व पुण्यामधील भरत नाट्य मंदिर येथे उत्साहात पार पडला. यावेळी वारकरी परंपरा, संत साहित्य आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले. तसेच प्रेक्षकांनी कार्यक्रमाला भरभरून दाद दिली.



रविंद्र नाट्य मंदिर येथील कार्यक्रमाला महाराष्ट्र पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.), पर्यटन संचालनालयाच्या कोकण विभागाचे उपसंचालक डॉ. प्रज्ञा मनोहर, पर्यटन विभागाच्या युवा दूत नवेली देशमुख आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

• **महत्त्वाच्या बातम्या**

## किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी वीर जीवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारणार




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्णयातून किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी वीर जीवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असून, या प्रकल्पासाठी प्रथम टप्प्यात एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यासंदर्भातील निवेदन पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी विधानसभेत सादर केले. ते म्हणाले, “उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अलीकडील महाबळेश्वर दौऱ्यादरम्यान विविध शिवप्रेमी संघटनांनी वीर जीवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याची मागणी केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून पर्यटन विभागामार्फत प्रतापगडाच्या पायथ्याशी भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.” हे स्मारक उभारल्यानंतर प्रतापगडाच्या शिवकालीन वारसा पर्यटनाला नवी चालना मिळेल. तसेच महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर प्रतापगडाची ओळख अधिक बळकट होऊन देश-विदेशातील पर्यटकांसाठी ते आणखी एक महत्त्वाचे आकर्षण ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## मुनावळे जलपर्यटन प्रकल्पाला गती; पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांचे निर्देश



मुनावळे जलपर्यटन प्रकल्प हा राज्याच्या पर्यटन विकासासाठी तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठीही अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. हा प्रकल्प निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी दिले.

विधानभवनात पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या उपस्थितीत जलपर्यटन प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यात पर्यटनाला चालना मिळून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. राज्यातील जलपर्यटनाला नवी चालना देणे हा प्रमुख उद्देश आहे. तसेच सातारा जिल्हा राज्यातील महत्त्वाचे जलपर्यटन केंद्र म्हणून विकसित होण्यास मदत होणार आहे. कोयना जलाशय परिसरात जागतिक दर्जाच्या जलपर्यटन सुविधा उभारण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. या अंतर्गत नौकाविहार, जलक्रीडा, पर्यटक सुविधा केंद्र आणि अन्य पर्यटन सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

## पर्यटन क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी एमटीडीसी आणि TAFI यांच्यात सामंजस्य करार




महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पर्यटनस्थळांसह अल्पपरिचित पर्यटनस्थळे, समृद्ध वारसा स्थळे, पर्यावरणपूरक पर्यटन स्थळे तसेच विशेष स्वरूपाच्या पर्यटन संकल्पनांमध्ये असलेल्या व्यापक पर्यटन क्षमतेची दखल घेऊन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) आणि ट्रॅव्हल एजंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (TAFI) यांच्यात पर्यटन उत्पादनांची दृश्यमानता, सुलभता आणि व्यावसायिक क्षमता वाढविण्यासाठी TAFI च्या देशव्यापी जाळ्याचा प्रभावी उपयोग करून परस्पर सहकार्य करण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली आहे.

या सामंजस्य करारावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. नीलेश आर. गटणे (भा.प्र.से) आणि ट्रॅव्हल एजंट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. अब्बास मोईझ यांनी स्वाक्षरी केली. याप्रसंगी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर जयस्वाल, ट्रॅव्हल एजंट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव (वेस्टर्न इंडिया) श्री. अरुण अय्यर तसेच राष्ट्रीय संयुक्त सचिव श्री. जितुल मेहता उपस्थित होते.

## 'वन स्टेट, वन डेस्टिनेशन' उपक्रमाच्या माध्यमातून सिंधुदुर्ग पर्यटनाला नवी दिशा

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'वन स्टेट, वन डेस्टिनेशन' उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे (भा.प्र.से) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात प्राथमिक नियोजन बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याची पर्यटन क्षमता अधिक व्यापक पातळीवर विकसित करण्यासाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीमध्ये पर्यटनस्थळांची निवड, आवश्यक पायाभूत सुविधा, पर्यटकांसाठी मूलभूत सोयी-सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, पर्यटन माहिती केंद्रे, डिजिटल प्रचार, स्थानिक कला, खाद्यसंस्कृती, पर्यटन सर्किटची निर्मिती, स्थानिक पर्यटनस्थळांचे ब्रँडिंग तसेच लोकसहभाग यावर विशेष भर देण्यात आला.



बैठकीमध्ये पर्यटन संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री. मंगेश जोशी (भा.प्र.से.) निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, उपजिल्हाधिकारी प्रतिभा वराळे, आरती देसाई, पर्यटन संचालनालयाच्या कोकण विभागाच्या उपसंचालिका डॉ. प्रज्ञा मनोहर, पर्यटन संचालनालयाचे कार्यकारी अभियंता आकाश चकोर, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत बुधावले तसेच विविध विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## पर्यटन स्थळांचा जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करा – पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई




महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची ओळख केवळ राज्य आणि देशापुरती मर्यादित न राहता ती आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचावी, यासाठी आधुनिक मार्केटिंग, डिजिटल ब्रँडिंग आणि प्रभावी प्रचारावर भर देण्याच्या सूचना पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित आढावा बैठकीत सन 2025-26 या आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या मार्केटिंग व ब्रँडिंग उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.), महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. नीलेश आर. गटणे (भा.प्र.से.), पर्यटन संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री. मंगेश जोशी (भा.प्र.से.), उपसचिव श्री. संतोष रोकडे, उपसचिव श्री. विजय पोवार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर जयस्वाल, सहसंचालक श्री. संतोष जाधव, सहाय्यक संचालक श्री. रविंद्र पवार, सहाय्यक संचालक श्री. सुशील पवार, कार्यकारी अभियंता श्री. आकाश चकोर यांच्यासह इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# • पावसाळ्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळे

## ठोसेघर धबधबा, सातारा



ठोसेघर धबधबा सातारा जिल्ह्याला लाभलेली अद्भूत नैसर्गिक देणगी आहे. या धबधब्याच्या मोठ्या जलप्रवाहामध्ये अनेक छोटे मोठे धबधबे उंचावरून खाली कोसळतात. सातारा शहरापासून अवघ्या 20 किलोमीटर अंतरावर असलेले हे ठिकाण कोकण कड्यांनी वेढलेले आहे. घनदाट जंगलाच्या दरीत तब्बल 200 मीटर उंचीवरून ठोसेघर धबधबा खाली कोसळतो. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये इतर धबधब्यांवर न मिळणारी शांतता येथे अनुभवायला मिळते. याचठिकाणी एक व्ह्यू पॉईंटही बांधण्यात आला आहे. येथून निसर्गसंपन्नतेचा मनमुराद आनंद घेता येतो.

## सहस्त्रकुंड धबधबा, नांदेड-यवतमाळ सीमा


सहस्त्रकुंड धबधब्याचा पर्यटन मार्गदर्शकांकडून फारसा उल्लेख केला जात नाही. मराठवाडा आणि विदर्भाच्या अगदी सीमेवर पैनगंगा नदीवर वसलेला हा धबधबा एक प्रसन्न अनुभव देणारा ठरतो. येथील जुन्या काळ्या खडकांवरून वाहणारे पाणी अनेक छोट्या-मोठ्या नैसर्गिक कुंडांमध्ये जमा होते. सहस्त्र म्हणजे हजार आणि कुंड म्हणजे पाण्याचे छोटे-मोठे साठे. यावरून या धबधब्याला सहस्त्रकुंड म्हणून संबोधले जाते. या परिसरात सगळीकडे विविध प्रकारच्या रंगीबेरंगी फुलपाखरांचे दर्शन घडते. धबधब्याच्या ठिकाणी असलेली शांतता आणि येथील निसर्गरम्य वातावरण पर्यटकांना वेगळ्याच विश्वात घेऊन जाते.



## लिंगमळा धबधबा, महाबळेश्वर



महाराष्ट्रातील प्रसिद्ध धबधब्यांच्या यादीमध्ये महाबळेश्वरमधील विविध ठिकाणांचा आवर्जुन उल्लेख केला जातो. लिंगमळा धबधबा तर महाबळेश्वरचे मुख्य आकर्षण आहे. दोन टप्प्यांमध्ये विभागलेला हा धबधबा घनदाट जंगलामधून वाट काढत अगदी उंच टोकावरून वेगाने कोसळतो. पावसाळ्यामध्ये लिंगमळा धबधबा अनुभवण्यासाठी पर्यटक आवर्जुन येतात. लिंगमळा धबधब्याला भेट द्यायची असेल, तर पावसाळ्याचा काळ सर्वोत्तम आहे. या दिवसांमध्ये ओसंडून वाहणारा धबधबा, हिरवागार निसर्ग व धुक्यामध्ये हरवलेला परिसर अनुभवताना संपूर्ण थकवा निघून जातो.


MAHARASHTRA
TOURISM
MAHARASHTRA
www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org
Follow us on:
MaharashtraTourism
diot@maharashtratourism.gov.in
@maha_tourism
maharashtratourismofficial